MAHARASHTRA STATE COUNCIL
FOR OCCUPATIONAL THERAPY & PHYSIOTHERAPY, MUMBAI
महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई
St. George'sHospital, Behind C.S.T. Station, Ph. 22620408
Email ID-otptcouncil@gmail.com, Web :- mahaotandptcouncil.in

ज.क्र.ओटीपीठी/परिषद/सूचना/टि.म.वी/ ११८ /२०२३ दिनांक: १० / 02 / 2023

# नोटिस/सूचना

**विषय :-** टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठ, पुणे येथून सन २०१२ या वर्षापर्यन्त प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना नोंदणी आणि नोंदणीचे नुतनीकरण देण्याबाबत.

महाराष्ट्र अधिनियम २००४(२) अन्वये महाराष्ट्र राज्यात भौतिकोपचार अभ्यासक्रम चालू करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची मान्यता/परवानगी घेणे अनिवार्य आहे. टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठ, पुणे यांनी महाराष्ट्र शासन निर्णय क्र. पी.एस.ओ-२०१०/प्र.क्र. १९६/१०/शिक्षण-१ दिनांक ३० मे २०१२ अन्वये ६० (साठ) इतकी भौतिकोपचार अभ्यासक्रमाची मान्यता घेतलेली आहे.

महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषदेच्या दिनांक ०२ मे २०२२ च्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन याबाबत खालील प्रमाणे सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

महाराष्ट्र शासनाची मान्यता/परवानगी नसताना देखील परिषदेकडून सन २०१२ च्या पूर्वीच्या विद्यापीठातील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना नोंदणी दिलेली आहे व दिलेल्या नोंदणीचे नुतनीकरणही होत आहे ते परिषदेने रद्द करावे व येथून पुढे सन २०१२ च्या पूर्वी (शासन मंजूरीच्या पूर्वी) सदरील विद्यापीठच्या प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना परिषदेत नोंदणी देण्यात येऊ नये व त्यांना दिलेल्या नोंदणीचे नुतनीकरणही करण्यात येऊ नये.

त्यामुळे टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठात भौतिकोपचार या अभ्यासक्रमास महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळाल्यानंतर (मे २०१२ नंतर) प्रवेश घेऊन पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच परिषदेत नोंदणी देण्यात येईल व त्यांचेच नुतनीकरण करण्यात येईल याची टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठ, पुणे येथुन पदवी घेतलेल्या तज्ञांनी नोंद घ्यावी.

प्रबंधक
श्री.दि.र.बिडवे
महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद